दैनिक
# लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ

व्यक्ति सर्वदा अन्यायाच्या साथी नसावा, पण न्यायाच्या साथी असावा

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार २६ जुले २०२५ | अंक २१७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# सर्वात जास्त काळ देशाचे पंतप्रधानपद भूषवणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दुसरे नेते

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आज त्यांच्या नावावर आणखी एक नवा विक्रम करणार आहेत. सलग सर्वाधिक काळ पंतप्रधान राहणारे मोदी हे दुसरे नेते बनणार आहेत. त्यांनी पंतप्रधान कार्यालयात 4 हजार 78 दिवस पूर्ण केले आहेत. हा कालावधी पूर्ण करतानाच त्यांनी देशाच्य माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनाही मागे टाकलं आहे.

शुक्रवारी नरेंद्र मोदी हे माजी पंतप्रधान इंदिरा गांधींना मागे टाकून सर्वाधिक काळ पंतप्रधान राहिलेले दुसऱ्या क्रमांकाचे नेते बनतील. अधिकाऱ्यांच्यां सांगण्यानुसार, आज अर्थात शुक्रवारी पंतप्रधान मोदी हे त्यांच्या ऑफीसमध्ये 4 हजार 078 दिवस पूर्ण करतील. देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांनी पंतप्रधान म्हणून 4 हजार 077 दिवस पूर्ण केले होते. 24 जानेवारी 1966 ते 24 मार्च 1977 सालापर्यंत त्या सलग 4,077 दिवस पंतप्रधान होत्या. तर देशाचे माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी तीन लोकसभा निवडणुकांमध्ये त्यांच्या पक्षाला विजय मिळवून दिला. सलग तीन वेळा त्यांच्या पक्षाला विजय मिळवून देण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. पंतप्रधान म्हणून जवाहरलाल नेहरूंनी 6 हजार 130 दिवस देशाची सेवा केली. ते 15 ऑगस्ट 1947 ते 27 मे 1964 सालापर्यंत पंतप्रधान पदी कार्यरत होते. त्यांचा कार्यकाळ 16 वर्ष 9 महिने आणि 12 दिवस इतका होता. पण



नरेंद्र मोदी यांनी पंडित नेहरींची बरोबरी केली आहे. त्यांनी देखील आपल्या पक्षाला (भाजप) लोपाठ तीन वेळा लोकसभा निवडणुकीत विजय मिळवून दिला आहे.

## सर्वात जास्त काळ पदावर राहिलेले बिगर काँग्रेसी पंतप्रधान

नरेंद्र मोदी हे भारतातील एकमेव नेते आहेत ज्यांनी एकाच पक्षाचे प्रतिनिधी म्हणून सलग सहा मोठ्या निवडणुकांमध्ये ऐतिहासिक विजय मिळवला आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीत 2002, 2007 आणि 2012 साली तर देशभरातील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये 2014, 2019 आणि 2024 मध्ये त्यांनी विजय मिळवला.

नरेंद्र मोदी यांनी केली पंडित नेहरूंची बरोबरी गुजरातमध्ये जन्मलेले नरेंद्र मोदी 2014 साली पहिल्यांदा मध्ये पंतप्रधान झाले आणि अजूनही पंतप्रधानपद भूषवत आहेत. 2001 साली ते गुजरातचे मुख्यमंत्री होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशातील सर्वात जास्त काळ बिगर-काँग्रेसी पंतप्रधान बनले आहेत.

# हरिश्चंद्र पिंपरी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेची पडझड, स्थानिक शिक्षण विभागाच दुर्लक्ष






वडवणी बीड प्रतिनिधी अंकुश गवळी

वडवणी तालुक्यातील राजा हरिश्चंद्र पिंपरी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत, या ठिकाणी या शाळेमध्ये पहिली ते चौथी या वर्गाचे पर्यंतचे विद्यार्थी शिक्षण घेतात सदरील शाळेची जुनी इमारत डब घाईला आलेली आहे, येथील ग्रामस्थांनी अनेक वेळा निवेदन देऊनही सुद्धा याच्याकडे प्रशासनाने लक्ष दिले नाही सदर इमारत खूप वर्षापासूनची आहे आणि ती

## इमारती लगतच विद्यार्थी घेतात शिक्षण, इमारतीपासून विद्यार्थ्याला धोका, दत्ता चव्हाण, शरद राठोड,

शाळेच्या लगतच ती इमारत सध्या जीर्ण झालेली आहे, इमारती लगतच विद्यार्थी त्या ठिकाणी शिक्षण घेत आहेत, कधी पण इमारत ढासळू शकते शकते, ग्रामस्थांनी अनेक वेळा निवेदन देऊन सुद्धा याची दखल घेतली जात नाही, यावेळी येथील शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद सुखदेव राठोड ,व ग्रामपंचायत सदस्य ,उपाध्यक्ष विकास पवार मुख्याध्यापक श्री मुळे सर ,अर्जुन राठोड, सुरेश चव्हाण ,बाळू राठोड, सुनील राठोड, रमेश चव्हाण, वारंवार निवेदन देऊनही स्थानिक चे सरपंच यांनी सातत्याने पाठपुरावा करूनही , स्थानिक शिक्षण विभाग दुर्लक्ष करीत आहे, त्यामुळे पालक येणाऱ्या काळात आमरण उपोषण करण्याचा इशारा संबंधित पालकांनी दिला आहे,

# पक्ष जी जबाबदारी देईल ती स्विकारायला तयार–राहूल नार्वेकर

मु ंबई: मागील काही दिवसांपासून राज्याच्या मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांच्या दिल्ली दौऱ्यात मोठे निर्णय झाल्याची माहिती समोर आली आहे. महायुती सरकारमधील ८ मंत्र्यांना घरी पाठवण्यात येणार असल्याची चर्चा सुरू आहे. तर, महायुतीच्या मंत्रिमंडळ बदलात विद्यमान विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची वर्णी लागणार असल्याचे म्हटले जात आहे. यावर आता राहुल नार्वेकर यांनी मौन सोडले असून भाष्य केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दिल्लीत असून त्यांच्या या दौऱ्यात राज्याच्या राजकीय आणि विकासात्मक पातळीवर काही निर्णायक घडामोडी घडल्याची माहिती समोर येत आहे. महायुती सरकारच्या आगामी रणनीतीसंदर्भात दिल्लीच्या उच्चपातळीवर बैठकांमध्ये महत्त्वाचे निर्णय घेतल्याचं वरिष्ठ सूत्रांकडून स्पष्ट झालं आहे. अशातच दुसरीकडे एका वृत्तपत्राने भाजपात सध्या नाराज असलेले माजी मंत्री, ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांची विधानसभा अध्यक्षपदी वर्णी लावण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. तर, राहुल नार्वेकर यांना आता कॅबिनेटमध्ये संधी देण्यात येणार असल्याचे म्हटले. या सगळ्या वृत्तावर राहुल नार्वेकर यांनी भाष्य केले आहे.

# मी पदावरून रिटायर झाल्यानंतर कुठलंही शासकीय पद स्वीकारणार नाही; सरन्यायाधीश भूषण गवईंचं मोठं विधान

दिल्लीः वृत्तसंस्था सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान सरन्यायाधीश महाराष्ट्राचे सुपूत्र भूषण गवई यांनी निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नसल्याचे म्हटले आहे. निवृत्तीनंतर जास्तीत जास्त वेळ दारापूर, अमरावती आणि नागपुरात घालवणार असल्याचे गवई यांनी म्हटले आहे. भूषण गवई हे सरन्यायाधीश झाल्यानंतर प्रथमच त्यांचे मूळ असलेल्या दारापुरात पोहोचले. त्यांचे आगमन होताच संपूर्ण गावकऱ्यांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. सरन्यायाधीशांना पाहण्यासाठी गावकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. गावी पोहोचताच सरन्यायाधीशांनी लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांनी आपल्या गावच्या जुन्या घराला भेट देत आठवणींना उजाळा दिला. गावातील विकंदर महाराज, राजे बुवा महाराज, हनुमान मंदिरांमध्ये भेटी देऊन दर्शन घेतले. गावामध्ये आगमन झाल्यानंतर गावातील शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शाळेसमोर उभे राहून सरन्यायाधीश भूषण गवई यांचे स्वागत केले. यावेळी भारत माता की जय अशा घोषणाबाजी सुद्धा विद्यार्थ्यांनी दिल्या. एकोप्यानं राहणाऱ्या गावाचं प्रतीक म्हणजे हे दारापूर असल्याचे सरन्यायाधीश म्हणाले.

# ग्रामीण रुग्णालयासमोरिल शहीद चौकात दुभाजकसह गतीरोधक करा नसता आंदोलन - हमीदखान पठाण

पाटोदा (प्रतिनिधी)


पाटोदा येथिल मांजसुंबा रोडवरील ग्रामीण रुग्णालयासमोर असलेल्या शहीद चौकात पाटोदा ते शंभर चिरा या रोडवर गतीरोधक व साळ नदीच्या पुलापासून ते बांमदळ वाडा दुभाजक तयार करावे अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ पाटोदा तालुकाध्यक्ष पत्रकार हमीदखान पठाण यांनी केली आहे.



जिल्हा परिषद व राष्ट्रीय महामार्ग यांनी स्वता लक्ष देऊन दुभाजक व गतीरोधक तयार करावे.हा शहीद चौक अपघात प्रवण क्षेत्र आहे.येथे उताराचा रस्ता आहे.तर या महामार्गावर वाहनाची रहदारी जास्त आहे.या चौकात तीन वस्त्या आहेत.येथे गतिरोधक व रोड दुभाजक असणे गरजेचे आहे.नसता आंदोलन करु असा इशारा दिला आहे. पुढे प्रसिद्धी पत्रकात नमुद केले आहे की. दुभाजक आणि गतिरोधक असले असते तर

शहीद चौकामध्ये गुरुवार दि २४ /७/२०२५ रोजी पाटोदा तालुक्यातील घाटेवाडी येथील वायकर दाम्पत्याला आपला जीव गमवावे लागले नसते. पाटोदा शहरातील शहीद चौकात शहीद अजित वाल्हेकर, शहिद संजय भाकरे, तसेच शहिद शेख तौसिफ यांचे स्मारक तर मस्नजोगी वसाहत, भुमि अभिलेख कार्यालय ग्रामीण रुग्णालये आहेत.यापुढे असे अपघात होऊ नये म्हणून पाटोदा साळनदी पुल ते बांमदळ वाडा येथ पर्यंत दुभाजक व शंभर चिरे कडे जाणाऱ्या रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात यावें नसता डॉ . गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करु व रस्ता रोको करण्यात येईल असा इशारा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ पाटोदा तालुकाध्यक्ष हमीदखान पठाण यांनी दिला आहे.


# धारूर घाटाच्या पायथ्याशी दोन वाहनाचा अपघात,एक जण गंभीर जखमी



धारूर /प्रतिनिधी धारूर घाटामध्ये अपघाताचे सत्र सुरुच असून २५ जुलै शुक्रवार रोजी संध्याकाळी ८ वाजेच्या सुमारास धारूर घाटाच्या पायथ्याशी अरणवाडी तलाव-ाजवळ स्विफ्ट डिझायर एमएच १४ जी यु १५७४ व बोलोरो पिकप एम एच २४ एक्स व्हि यू ७८८४ यामध्ये अपघात होऊन स्विफ्ट डिझायर मधील नितीन उत्तम काळे वय वर्ष ३६ रा-हणार चिंचोली माळी हा जखमी झाला आहे. अपघात होताच पिकप मधील वाहन चालक फरार झाला असून येणाऱ्या जाणाऱ्या वाट सरू व पोलीस प्रशासन यांनी घटनास्थळी जाऊन संबंधित जखमी काळे यांना १०८ रुग्णवाहिकेमध्ये उपचारासाठी धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात उपच-ारासाठी पाठवण्यात आल

# शिक्षक कॉलनी भागातील नागरिकांनी गणेश उत्सव आदर्श पद्धतीने साजरा करण्याचा घेतला निर्णय

केज/प्रतिनिधी केज शहरातील शिक्षक कालनी भागातील नागरिकांनी बैठक घेऊन आगामी गणेश उत्सवात कोणताही धांगडधिंगा न घालता एकदम साध्या पद्धतीने गणेश जयंती उत्सव साजरा करुन एक आदर्श निर्माण करण्याचा निर्णयघेतला आहे.कोणालाही वर्गणी न मागण्याचा निर्णय समस्त शिक्षक कॉलनी भागातील रहिवासी लोकांनी घेऊन एक आदर्श निर्माण केला आहे.येणारा गणेश उत्सव व इतर सर्वच उत्सव साजरे करताना पारंपरिक व साध्या पद्धतीने,उत्साहात प्रत्येक उत्सव साजरा करण्याचा निर्णय एकमताने घेण्यातआला आहे.डिजेचा धिंगाणा व इतर गोष्टी यामुळे टाळल्या जातात.गणेश उत्सवात पारंपरिक देवाची गाणी,पुजातसेच प्रसाद ठेऊन गणेश उत्सव साजरा करण्यात येणार आहे.शिक्षक



कॉलनी,बीड रोड केज च्या नागरिकांचे व युवकांचे याकौतुकास्पद निर्णयामुळे सर्वत्र कौतुक केले जात आहे. यामध्ये दत्ता धस पंत, पिटू भैय्या तांदळे, खय्युम शेख,भगवान केदार,सुनील घोळवे, अमर केजकर,राजेश गवळी सर,डॉ. विजयकुमार धस, प्रकाश मु ंडे,सोनू धस, दिनकर तांदळे सर, प्रशांत मुळे,रवि घुले, अमोल धस,संदीप भुतडा,चंदू चौरे,सुरेश घुले,राजेश मुळे, राजेभाऊ शिंदे, सुर्यवंशी दादा,पाळवदे सर,घुले सर,गोटू पाळवदे,अमोल मुंडे, वैभव केंद्रे,डॉ.डापकर साहेब,नवनाथ घुले, राज ढाकणे,प्रा.मुकूं द घुले सर,रवि अंधारे, विजय अंधारे,गालफाड तात्या,मयुर भैय्या टकले,डोईफोडे मेजर, विकास मुळे,अतूल ठोंबरे,अमोल ठोंबरे, चौरे साहेब दुकानदार, हांगे सर,विक्की घोडके, बाबा मुंडे सर व इतर प्रमुख मान्यवर यांनी हा एक चांगला पायंडा मांडला आहे.या निर्णया चे सर्वस्तरातून,व्यापारी वर्ग,नेते मंडळी तसेच सामान्य जनतेतुन केज शहरात सर्वत्र कौतुक केले जात आहे. ईतरांनी या निर्णयाचा आदर्श घ्यावा अशी अपेक्षा नागरिकांतुन व्यक्त केली जात आहे.

दैनिक लोकारंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २६ जुले २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### यंदाचा गणेशोत्सव

यंदाचा गणेशोत्सव आता जेमतेम महिन्यावर आलेला असताना मूर्ती विसर्जनाबाबत निर्माण झालेला पेच मु ंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे संपुष्टात आला आहे. गणेशोत्सवाची वाढत चाललेली लोकप्रियता, जल्लोषात उत्सव साजरा करण्याची भक्तांची मानसिकता आणि त्यातूनच मूर्तींच्या उंचीबाबत निर्माण झालेली चढाओढ यातूनच गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच माघी गणेशोत्सवातील मूर्ती विसर्जनाबाबत समस्या निर्माण झाली होती. गणेश मूर्तींची वाढती उंची हा भाविकांच्या उत्साहाचा विषय असला तरी विसर्जन मिरवणुकीसाठी उंच मूर्ती मंडपातून काढणे, विसर्जनस्थळी वाजतगाजत नेणे, रस्त्यादरम्यान होणारी वाहतूक कोंडी, भाविकांचे नृत्य, गणेश भक्तिपर गाण्यांचा जल्लोष यामध्ये मंडपातून निघालेली मूर्ती वाहनातून विसर्जनस्थळी नेईपर्यंत मूर्ती सांभाळणाऱ्या कार्यकर्त्यांना करावी लागणारी तारेवरची कसरत हे एकप्रकारचे अग्निदिव्यच असते. दरवर्षी उंच मूर्ती विसर्जित करताना महापालिका कर्मचारी, सुरक्षा रक्षक, मंडळाचे पदाधिकारी, सदस्यांना द्राविडी प्राणायम करावा लागतो. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींच्या उंचीवरून वादास सुरुवात झाली आहे. पीओपीच्या मूर्तींना बंदी घालण्यात आली असली तरी विविध कारणांमुळे बंदीच्या अंमलबजावणीला अजून यश आलेले नाही. पीओपींच्या मूर्तींचा वाद हा अलीकडच्या गेल्या काही वर्षांमध्ये निर्माण झालेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०२५ पीओपीपासून बनवलेल्या मूर्ती आणि त्यांचे जलसाठ्यात विसर्जन करण्याविरुद्ध अंतरिम आदेश दिला आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले. तथापि, न्यायालयाने आदेश देऊनही बाजारात पीओपीच्या मूर्ती आजही निर्माण होत आहेत. पीओपींच्या मूर्तींमुळे जलप्रदूषण होत असल्याने केंद्र सरकारने त्या मूर्तींच्या विसर्जनास वारंवार आक्षेप घेत शाडूच्या मूर्ती अथवा अन्य पर्यायाचा शोध घेण्यास यापूर्वीच सुचविले आहे. पीओपी पर्यावरणपूरक नाही. ते नद्यांमध्ये, पाण्यात विरघळू शकत नाही. त्यामुळे नद्या उथळ होतात. दुसरीकडे तलाव किंवा विहिरीत विसर्जन केले, तर नैसर्गिक पाण्याचे स्रोत खराब होतात. त्यामुळे या मूर्तींना नाही तर त्यांच्या विसर्जनाला व त्यातून निर्माण होणाऱ्या जलप्रदूषणाला केंद्र सरकारने वारंवार आक्षेप घेतला आहे. केंद्राचा हेतू पर्यावरणपूरक असला तरी अनेकजण रोजगाराला मुकतील, बेरोजगार होतील, अनेकांना कर्जबाजारी व्हावे लागेल अशा स्वरूपाचे आक्षेप घेत अनेकांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. २०१२ पासून केंद्र सरकार पीओपी मूर्तींच्या विरोधात असले, तरी भाविकांची पीओपी मूर्ती खरेदी करण्याची मानसिकता, सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळाचाही याच मूर्ती खरेदीबाबतचा आग्रह यामुळे बाजारात पीओपीच्या मूर्तींवर बंदी येणे तूर्तास तरी शक्य दिसत नाही. धर्म आणि रूढी-परंपरांच्या नावाखाली पर्यावरणाचा विचार सोडून देणे आणि अविचारी पद्धतीने उत्सव साजरे करणे हे मुळात चुकीचे असले तरी आजही कोणी हे समजून घेत नाही, हीच खरी शोकांतिका आहे. मूर्ती बनवणाऱ्यांना मूर्ती बनवण्यासाठी नैसर्गिक, विघटनशील आणि पर्यावरणपूरक कच्च्या मालाचा वापर करण्यास कोणाकडूनही प्रोत्साहित केले जात नाही. त्यातून पीओपी मूर्ती विसर्जनावरून केंद्र सरकार व मूर्ती उत्पादक यांच्यातील वाद उच्च न्यायालयात गेला. न्यायालयाने या वादावर तोडगा काढला असला तरी हा तोडगा हंगामी स्वरूपाचा आहे. कायमस्वरूपी नाही. येणाऱ्या माघी गणेशोत्सवापर्यंतच या तोडग्याची मुदत आहे. सहा फुटांवरील गणेश मूर्तींचे समुद्रात, तर त्याखालील मूर्तींचे कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. पाच फुटांपर्यंतच्या मूर्ती विसर्जनाबाबत कृत्रिम तलावामध्ये न्यायालयाने आदेश दिले असले तरी मुंबई तसेच मुंबई सभोवतालच्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मु ंबई, पनवेल या एमएमआरए क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांवरील जबाबदारी वाढविली आहे. पाच फुटांपर्यंतच्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची उंची व खोली याचाही स्थानिक प्रशासनाला प्राधान्याने विचार करावा लागणार आहे. गणपतीबाप्पा हा श्रद्धेचा विषय आहे. या मूर्तींचे विसर्जन पारंपरिक पद्धतीने व्हावे असा त्यांचा आग्रह असला तरी गणेश भक्तांची अलीकडच्या काळात विसर्जनाबाबतची मानसिकता बदलली आहे, हा खरोखरीच बदल मानावा लागेल. वाहतूक कोंडी, परिसरापासून काही अंतरावर विसर्जन स्थळ, विसर्जन स्थळी असणारी गर्दी व त्यातून विसर्जनास होणारा विलंब आणि अनेकदा विसर्जनासाठी हमखासपणे असणारी वरुणराजाची हजेरी यामुळे घराजवळच उपलब्ध असणाऱ्या कृत्रिम तलावांचा पर्याय गणेश भक्तांनी स्वीकारला आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी जिल्ह्यातील ५२ रुग्णालये संलग्न

## जिल्ह्यात ६१० रुग्णांना ४ कोटी ८९ लाख ६ हजार रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत

बीड, दि. 25 : मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष पात्र व गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. 1 जानेवारी ते 30 जून दरम्यान बीड जिल्ह्यात 610 रुग्णांना 4 कोटी 89 लाख 6 हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे नोडल अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य कागदे यांनी दिली. राज्यातील नागरिकांना दुर्धर आजारांवरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातून मदत मिळविण्यासाठी नागरिक मंत्रालयात जात असत. परंतु नागरिकांना या सेवा सहजपणे त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात, म्हणून आता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या बीड येथे हा कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत कार्यरत आहे. वैद्यकीय मदत मिळण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी संलग्नित जिल्ह्यातील 52 रुग्णालयांचा समावेश आहे. या निधीच्या मदतीतून रुग्ण या रुग्णालयात उपचार करुन घेतात. संलग्नित रुग्णालयांची यादी पुढीलप्रमाणे. बीड शहर विठ्ठल हॉस्पिटल, लाईफ लाईन मल्टी स्पेशालिटी सर्जिकल हॉस्पिटल, कृष्णा हॉस्पिटल, सावळकर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, संकल्प हॉस्पिटल, गुरुकृपा ॲक्सिडेंट हॉस्पिटल आणि डायग्नोस्टिक सेंटर, रेणू हॉस्पिटल, बार्शी रोड, हाके हॉस्पिटल, फोनिक्स क्रिटिकल केअर अँड सर्जिकल युनिट, दीप हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर युनिट, श्री माऊली हॉस्पिटल (क्रिटिकल सर्जिकल), साईबाबा हॉस्पिटल, ओम सर्जिकल हॉस्पिटल, जालना रोड, तुळशी क्लिनिक, यश हॉस्पिटल, बार्शी रोड, आनंद हॉस्पिटल, जालना रोड, वीर्यान हॉस्पिटल, देशमुख हॉस्पिटल, जालना रोड, श्री बाल रुग्णालय, जुने बीड, यशवंतराव जाधव स्मारक रुग्णालय आणि संशोधन केंद्र प्रा. लि., सुश्रुत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, स्पंदन हॉस्पिटल, नोबल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, ॲलन हॉस्पिटल, गौरी हॉस्पिटल, लाड बाल रुग्णालय, जीएसके हेल्थकेअर एलएलपी, जुने बीड, काकू नाना मेमोरिअल हॉस्पिटल, यशवंत मातृ रुग्णालय, योगीराज हॉस्पिटल आणि आयसीयू, लाईफ लाईन हॉस्पिटल, नगर नाका, जीएसके हेल्थ केअर एलएलपी, महिला कॉलेज रोड, नवीन बीड, नीरा बाल रुग्णालय, डी.पी. रोड, फोनिक्स क्रिटिकल केअर आणि सर्जिकल युनिट, जालना रोड, घोलवे हॉस्पिटल, भाग्य नगर, सूर्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि क्रिटिकल केअर युनिट, डी.पी. रोड, आयकॉन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, महानंदा हॉस्पिटल, श्री बाल रुग्णालय, जनाई बाल रुग्णालय, श्री नारायणी चाइल्ड केअर युनिट, वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, संजिवनी हॉस्पिटल आणि क्रिटिकल केअर

**परळी वैजनाथ**
श्रीकृष्ण ॲक्सिडेंट हॉस्पिटल, कराड हॉस्पिटल, श्री समर्थ हॉस्पिटल

**अंबाजोगाई** आशा इंटेन्सिव्ह केअर युनिट आणि रिसर्च सेंटर

**माजलगाव**
शतायुषी फाउंडेशन, यशवंत हॉस्पिटल अँड क्रिटिकेअर

**आष्टी**
शेंडगे हॉस्पिटल, कडा

**गेवराई**
आधार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटर

# ब्रम्हगाव जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहिर.

## - अध्यक्षपदी सुधाकर कांबळे तर उपाध्यक्षपदी अंशीराम कांबळे

-किसन बी पवार
माजलगाव प्रतिनिधी , दि.25.07.2028 : माजलगाव शहरापासुन जवळच असलेल्या ब्रम्हगाव येथे नुकतीच गावकर्यांच्या वतीने संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहिर करण्यात आली असुन,अध्यक्षपदी सुधाकर कांबळे यांची तर उपाध्यक्षपदी अंशीराम कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी कॉंग्रेस पक्षाचे नेते तथा आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी गुलाब पुष्पहार घालून अध्यक्ष व उपाध्यक्ष सह सर्व सदस्य व कार्यकारणीचा सत्कार करून जंगी कार्यक्रम करण्यासाठी प्रोत्साहन दिले. यावेळी ब्रम्हगाव येथे अण्णाभाऊ साठे जयंती विवीध सामाजिक उपक्रमाने साजरी करण्यात येणार असुन यामध्ये व्याख्यान, महिलांना साडी वाटप, जिल्हा परिषद शाळेला कॉम्प्युटर व प्रोजेक्टरची भेट, संविधान प्रतींचे वाटप असे विवीध उपक्रम होणार आहेत. यासाठी गावाच्या स्वखर्चाने जयंती साजरी होणार असुन इतरांना वर्गणी न मागण्याचा संकल्प करण्यात आला आहे. जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अध्यक्षपदी सुधाकर



कांबळे यांची तर उपाध्यक्षपदी अंशीराम कांबळे, सचिव विठ्ठल कांबळे, अशोक कांबळे, श्रीमंत कांबळे, सहसचिव अंजन कांबळे, कोषाध्यक्ष दशरथ कांबळे, सदस्य बाबासाहेब कांबळे, भानुदास कांबळे यांच्या निवडी करण्यात आल्या, तर अशोक कांबळे, मधुकर कांबळे, बंडू कांबळे, शिवाजी कांबळे, निलेश कांबळे सह गावकर्यांनी या

# पंकजाताई मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त शेख फाऊंडेशन व समाज कल्याण न्यासच्या वतीने पसायदानच्या अनाथ व गरजु मुलांना अन्नदान

बीड (प्रतिनिधी) - पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शेख फाउंडेशन व समाज कल्याण न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने ढेकणमोह येथील पसायदान सेवा प्रकल्पातील अनाथ व गरजु मुलांना अन्नदान करण्यात आले. तसेच पसायदानच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यासह मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शेख फाउंडेशन आणि समाज कल्याण न्यास यांच्या वतीने दरवर्षी पसायदान सेवा प्रकल्पामध्ये सामाजिक उपक्रम राबवला जातो. पसायदानच्या अनाथ व गरजु मुलांना गेल्या १५ वर्षापासून पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप, अन्नदान करण्यात येत आहे. यंदाही दि. 26 जुलै रोजी ढेकणमोह येथील पसायदाच्या मुलींच्या हस्ते केक




कापून पंकजाताई मुंडेंचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच पसायदान प्रकल्पात मुलांना एक दिवसाचे अन्नदान करण्यात आले. यावेळी भाजपचे नेते शेख फारुख, बाबुराव खाडे, ॲड. विनोद जायभाये, पत्रकार अशोक खाडे, गोरख मुंडे, गणेश दराडे, डॉ.डिगे, शिवाजी चाटे, मतीन बागवान, संदीप अदमाने, रमेश कदम, इलियास पठाण, पप्पु तावरे, मुबारक शेख व सायदानचे संचालक गोवर्धन दराडे आदींच्या उपस्थितीत वृक्षारोपण आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

# श्रावण मासानिमित्त भालचंद्र गणपती मंदिरांची भक्तांकडून स्वच्छता मोहीम ; विना उभारण्यात आला:- डॉ.गणेश ढवळे

## श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात परंपरागत विना उभारण्यात आला

लिंबागणेश:- ( दि.२५ ) श्रावण महिना अध्यात्माचा,मन:शुद्धीचा पावित्र्याचा आणि व्रतवैकल्याचा संस्कृतीचे मोठे महत्त्व म्हणून ओळखला जातो. ऊन पावसाचा लपंडाव खेळणारा, इंद्रधनुष्याची कमान बांधणारा,हिरवाईचा गालिचा अंथरुणारा व्रतवैकल्याने सात्विकतेचा सडा शिंपणारा, निसर्गाची समृद्धी उधळणारा श्रावण महिना आज दि.२५ शुक्रवार पासुन सुरु झाला असुन २३ आगस्ट पर्यंत श्रावणाचा बहर सुरू राहणार आहे.सण उत्सव, व्रतवैकल्याची मांदियाळी घेऊन आलेल्या या हिरव्या ऋतुच्या स्वागतासाठी प्रत्येक जण आतुर झाला आहे.



धार्मिक विधी,सण यांची रेलचेल असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आपल्या संस्कृतीत या महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व असुन यानिमित्ताने महादेव मंदिरासह सर्वच मंदिरांमध्ये भाविकांची दर्शनासाठी,पुजा,अर्चा करण्यासाठी गर्दी होते. आपण नतमस्तक होणारा परीसर स्वच्छ असायला हवा यासाठी श्रावण महिन्यात गावातील सर्वच मंदिरांची स्वच्छता करताना पहावयास मिळते. मंदिराच्या स्वच्छतेसाठी भाविक, तरूण मंडळी, वारकरी सगळेच आघाडीवर असतात. आज बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिर, हनुमान मंदिर, खंडोबा मंदिर, श्रीकृष्ण मंदिर आदी मंदिराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता मोहीमेत दगडु कांबळे,गणपत दाभाडे, कल्याण वाणी,शिवाजी वाणी, वरद जोशी,अभिजित गायकवाड,सुरज भोसले,अक्षय आबदार, रोहित भोसले कमलाकर जाधव,सचिन भोसले,विवेक भोसले, हरिओम क्षीरसागर आदि सहभागी झाले होते. श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात परंपरागत विना उभारण्यात आला प्रति वर्षाप्रमाणे लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात परंपरागत विना उभारण्यात आला. सर्वप्रथम भजणी मंडळी व भाविकांच्या उपस्थितीत गणपती पुजन , नवग्रह पुजन व ग्रंथराज पुजन करून विना उभारण्यात आला.यावेळी देवस्थान विश्वस्त, पुजारी आणि भाविक मंडळी उपस्थित होती. महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २६ जुले २०२५
https://lokaarambh.com


# बिबट्या पाळीव जनावरांना भक्ष बनवतोय..
## बालाघाटाच्या डोंगर रांगेतील गावांमधील गावकरी, शेतकऱ्यांनी सतर्क रहावे - संचालक धनंजय गुंदेकर



बीड (प्रतिनिधी) तालुक्यातील वांगी परिसरात बालासाहेब गोरख हाडूळे या शेतकऱ्याच्या 11 शेळ्या ह्या बिबट्याने ठार मारल्या आहेत... हि घटना काल दिनांक 25 जुलै 2025 रोजी सकाळी 11 वाजेच्या सुमारास घडली आहे... यापूर्वीही वांगी येथे बिबट्याने एका वासराचा बळी घेतला होता..

तालुक्यातील वांगी, शिवणी, काठोडा, भवानवाडी, कुटेवाडी, जरुड, बाभळखुंटा, बोरफडी, हिवरा, मौजवाडी, मौज, बकरवाडी, घाटसावळी, पोखरी, मैंदा या गावातील गावकरी व बालाघाट डोंगर रांगेतील असलेल्या गाव परिसरातील सर्व शेतकरी बांधवांनी शेती कामे करताना काळजी घ्यावी व आपले जनावरेही सुरक्षित ठेवावी. संबंधित घटनेबाबत वन विभाग व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पंचनामा केलेला आहे.. शेती मध्ये काम करताना लहान लेकरांना शेतात घेऊन जाऊ नये, शेतीला पाणी देण्यासाठी जाताना शेतकऱ्यांनी हातात घंटी किंवा आवाज करणारे वाद्य सोबत काठी घेऊन जावी, पाळीव जनावरांना सुरक्षितता करून ठेवावी असे आवाहन धनंजय गुंदेकर यांनी केले आहे.

# श्रावणसांज काव्यमैफिल अध्यक्षपदी .माणदेश कवी डॉ लक्ष्मण हेंबाडे यांची निवड



प्रतिनिधी -जगदीप वनसिव मंगळवेढा - येथील माणदेश कविवर्य डॉ लक्ष्मण हेंबाडे यांची श्रावणसांज काव्य मैफिल अध्यक्षपदी निवड करण्यात आली अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषद राजगुरुनगर अध्यक्ष संतोष गाढवे यांनी दिली डॉ लक्ष्मण हेंबाडे लिखित पांदवाट हा महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेला काव्यसंग्रह वाचून ग्रामीण भागातील अस्सल मराठी बाज आहे त्यामुळे महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा राजगुरुनगरचे अध्यक्ष संतोष गाढवे आणि संस्थेतील संचालक मंडळांनी एकमताने माणदेश कविवर्य डॉ लक्ष्मण हेंबाडे यांची निवड केली आहे

श्रावणसांज काव्य मैफिल पुरस्कार वितरण सोहळ्याचे अध्यक्ष डॉ प्रा संदीप सांगळे (अध्यक्ष - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ )अध्यक्ष प्रमुख पाहुणे म्हणून लोककवी सिताराम नरके (राष्ट्रपती पोलीस पदक मानकरी ) तसेच प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध कवी देवा झिंजाड या राज्यस्तरीय श्रावणसांज काव्य मैफिलीचे सूत्रसंचालन महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध रानकवी जगदीप वनशिव हे सूत्रसंचालन करणार आहेत महाराष्ट्र राज्यातून 110 कवींनी सहभागासाठी नोंदणी केली आहे बहारदार दमदार श्रावणसांज काव्य मैफिल ही औद्योगिक शहरातील चाकण येथे संपन्न होणार आहे विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून काव्य मैफिलची शोभा वाढवणार आहेत असे जाहीर आव्हान कवी संतोष गाढवे यांनी केले आहे

# बीड येथे गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने शालेय साहित्य वाटप सोहळा उत्साहात संपन्न



बीड, दि. २६ जुलै २०२५: गुरु आनंद महिला प्रतिष्ठान, बीड (अध्यक्ष: श्रीमती सीमा ओस्तवाल) आणि प्रयास फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. गणेश विद्यामंदिर, शिवाजीनगर, बीड येथे शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. ही संस्था शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकासासाठी कार्यरत असून, वंचित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, शिष्यवृत्ती आणि मार्गदर्शनाद्वारे शिक्षणाला प्रोत्साहन देते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. संजय गुंजाळ उपस्थित होते. यावेळी श्री. नितीन सोनवणे (महाराष्ट्र प्रवक्ता व जिल्हाध्यक्ष, ऑल इंडिया पँथर सेना, बीड), समाज कार्यकर्ते श्री. अक्षय माने, संस्थेचे सदस्य श्री. रवि धोंडगे, मुख्याध्यापक श्री. उमेश पवार, तसेच श्रीमती मनीषा हरणमारे, वंदना पारवे, सुजाता सावंत, सविता जैन यांच्यासह शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. मान्यवरांनी गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने शुभेच्छा देताना शिक्षण आणि सामाजिक सहभागाच्या महत्त्वावर प्रेरणादायी संबोधन झाले. संस्था महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करत असून, स्थानिक पातळीवर सामाजिक जागरूकता आणि समुदाय विकासासाठी सक्रिय आहे. या उपक्रमाद्वारे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरित करून शिक्षणाच्या प्रगतीसाठी एक पाऊल पुढे टाकण्यात आले. संस्थेचे हे कार्य वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि स्थानिक समुदायाला बळकटी देण्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# नांदेडच्या भूमिपुत्रांचे मदिरा या आगामी मराठी चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण
## चित्रपटाचे दिग्दर्शक के.व्ही यशोदा तातेराव व किनवटचे लक्ष्मीकांत मुंडे यांचीही चित्रपटात महत्वाची भूमिका

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांच्या हस्ते दि.२१-जुलै रोजी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ शाखा पुणे येथे मदिरा या मराठी चित्रपटाचे पोस्टर अनावरण झाले. यावेळी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त फॅन्ड्री फेम अभिनेते सोमनाथ अवघडे (जब्या) राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त पिस्तुल्या व सैराट फेम अभिनेते सूरज पवार,अरबाज शेख व माय यशोदा फिल्म्स अँड एंटरटेनमेंट संपूर्ण टीम उपस्थित होती. मदिरा चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक के. व्हि.यशोदा तातेराव हे नांदेड तालुक्यातील वडवणा या गावचे असून त्यांनी चित्रपट निर्मितीचे शिक्षण मुंबई,पुणे येथील नामांकित संस्थेत घेतले असून त्यांनी या पूर्वी ग्लोबल आडगाव या चित्रपटात प्रोडक्शनसाठी आणि भाऊचा धक्का या मराठी चित्रपटात साह्यक दिग्दर्शक म्हणून काम केलं आहे. सदरील चित्रपटात सहनिर्माते आर.साळुंके, कार्यकारी निर्माता एस.वाय. मोहिते,गीत आणि संगीत रवींद्र जाधव, सूरज चव्हाण संकलन वेंकटेश कदम, रवींद्र टाक, छायाचित्रण प्रकाश पारडकर,कला दिग्दर्शक किरण गायकवाड,प्रमोद अंभोरे रंगभूषा ऋणीता धर्मेंद्र गोवंदे चित्रपटात कलाकार सोमनाथ अवघडे,सूरज पवार,अरबाज शेख,शंकर मोहिते,रवी साळुंके,पौर्णिमा सगर,आरती साळुंके, श्रुती देशमुख, ऋषी सोनकांबळे व लक्ष्मीकांत मुंडे यांच्यासह बाल कलाकार विकास मोहिते,यश मोहिते,अर्निशा सागर भुमक,अरव राष्ट्रपाल खंदारे यांच्याही भुमिका आहेत. या चित्रपटात किनवटचे कलाकार लक्ष्मीकांत मुंडे यांची ही महत्वाची भूमिका असून नांदेड परिसरतील नविन कलाकारांना देखील सदरील चित्रपटात काम करण्याची सुवर्णसंधी असल्याचे लेखक व दिग्दर्शक के.व्हि. यशोदा तातेराव यांनीसांगितले.




# १० वर्षे, १६ अर्ज – तहसील कार्यालयाचं दरवाजा की दगडाचा किल्ला?
## मुख्यमंत्री साहेब योजनेत रस्ता दिला प्रत्यक्षात चिखल दिला!




बीड : प्रतिनिधी (लोकपत्रकार भांगे) मौजे खडकी आणि देवळा, ता. वडवणी, जि. बीड या दोन गावांतील शेतकरी गेल्या १० वर्षांपासून एकाच मागणीसाठी तहसील कार्यालयाची उंबरे झिजवत आहेत – शिव रस्ता मोकळा करा! २०१५ पासून शासकीय रस्त्यावर अतिक्रमण झाले असून, या रस्त्याचा उपयोग शेतात जाण्यासाठी दोन्ही गावांतील अनेक शेतकरी करतात. पण हे अतिक्रमण दूर करण्यासाठी दिलेले अनेक लेखी अर्ज, ई-मेल, विनंत्या, आणि आठवणी – सर्व हवेत विरल्या आहेत!

### तहसीलदार वडवणी झोपलेत का?

१६ वेळा लेखी अर्ज, जिल्हाधिकाऱ्यांना विनंत्या, मंत्री अब्दुल सत्तार, महसूलमंत्री बावनकुळे यांच्यापर्यंत मेल – आणि तरीही परिस्थिती बदललेली नाही. शेवटी या अन्यायकारक दुर्लक्षामुळे खडकी व देवळा येथील शेतकरी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसलेत.सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे, उपोषणाच्या दिवशी मुसळधार पाऊस सुरु होता, तरीही शेतकरी जागा बदलत नाहीत. त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितलं – "आमच्या जीवाला काही झालं, तर जबाबदारी तहसीलदार वडवणी यांची असेल!" मुख्यमंत्री साहेब, 'समग्र योजना' फक्त भाषणातच का?एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंचावरून मोठ्या थाटात घोषणा करतात – "प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता मिळणार. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणार."मात्र, खडकी व देवळा येथील शेतकऱ्यांना ही योजना कधी लागू होणार?

### सरकारचं 'शेतकरी प्रेम' खोटं?

राज्यातील सत्ताधारी नेहमी शेतकऱ्यांचे रक्षणकर्ते असल्याचा आव आणतात. पण प्रत्यक्षात मात्र तहसील कार्यालयाच्या दारात पावसात भिजणाऱ्या शेतकऱ्यांकडे पाहायला कोणताही अधिकारी येत नाही. १० वर्षे उलटूनही न्याय मिळत नाही, यावरून शासन किती गंभीर आहे, हे समजतं! शेवटी एकच सवाल – "मुख्यमंत्री साहेब, किती वेळा अर्ज करायचे? किती वेळा मेल टाकायचे? आता काय – मृत्यूच सरकारला जागं करणार का?"खडकी आणि देवळा येथील शेतकऱ्यांच्या डोळ्यातील पाणी हा पावसाचा भाग नसून, शासनाच्या निष्क्रियतेवरचा रडवेला हळवा सवाल आहे...

# अँड.सुफियान यांनी मिळवली वकिल क्षेत्रातील एल.एल.एम पदवी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
किनवट : गोकुंदा येथील माजी सरपंच म.लतिफोद्दीन यांचे चिरंजीव म.सुफियान यांनी जुन २०२५ मध्ये Master of Law (LL.M) -Criminal या विषयामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथून पदव्युत्तर पदवी यशस्वीपणे पुर्ण केली.त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. सुफीयान यांच्या परिवारातील सदस्य हे उच्चशिक्षित व शासकीय सेवेचे असल्याकारणाने त्यांना लहानपणापासूनच शिक्षणाचे बाळकडू परिवाराकडून मिळाले.आपले व परिवाराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मागे वळून न पाहता



आपल्या आवडीचं क्षेत्र निवडून वकील बनण्याचं स्वप्न सुफीयान यांनी रंगवलं त्यासाठी जिद्द, मेहनत, चिकाटी, ध्येय हे सूत्र अंगीकारून या बळावर त्यांनी हे यश यशस्वीरित्या पूर्ण केलं आहे.या यशामागे आई वडील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.बी.अली यांचा मोलाचा वाटा आहे.यांच्या मार्गदर्शनाखाली (Critical Apprecia-tion Of Legal Provi-sions To Control Violence Against Women) या विषयामध्ये त्यांनी शोध प्रबंध सादर केला.सन २०२३ मध्ये LL.B. पदवी प्राप्त केली असुन, LL.B. व LL.M. पदव्युत्तर पदवीचे शिक्षण स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत शरदचंद्र पवार लॉ कॉलेज नांदेड येथून यशस्वीरित्या पुर्ण केले.तर प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गोकुंदा येथील महात्मा फुले विद्यालयातून झाले. न्यायदानाचं क्षेत्र हे माझं आवडतं क्षेत्र असुन या क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी यशस्वी करण्यात मला यश आले आहे.या यशामागे माझ्या आई वडील परिवाराचा व गुरुजनांचा वाटा आहे. भविष्यात मला नामवंत वकील व्हायचे असून माझ्या हातून अन्यायाग्रस्त जनतेला न्याय मिळावा यासाठी मला बळ मिळण्यासाठी ईश्वराचा व गुरुजनांचा आशीर्वाद मिळावा अशी अपेक्षा अँड. मोहम्मद सुफियान यांनी व्यक्त केली. या उज्वल यशाबद्दल मित्रपरिवार व सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन होत आहे.

# कुरेशी समाजाला न्याय व मागण्या मान्य होत नाही तो पर्यत बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या बंद करा...मुस्ताक कुरेशी
## जिल्हाधिकारी साहेब चिकन मटण व पशू हत्या बंद करण्यासाठी आदेश काढा.

किसन बी पवार माजलगांव प्रतिनिधी . दि .25.072025. महाराष्ट्र मध्ये कुरेशी समाजाने पशू खरेदी विक्री बंद पुकारले कुरेशी समाजाला काही गुंडे तर्फे त्याच्या वाहने अडवण्याचा प्रयत्न करणे जनावरे लुटणे तसेच त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करणे माहित नसताना पण त्यांना तुम्ही जनावरे कत्तलीसाठी घेऊन जात आहे असे आरोप लाऊन मारहाण करणे असे घटना सारखे कुठे ना कुठे घडत आहे तसेच पोलीस प्रशासन तर्फे मदत मिळत नाही व्यापारी वर गुन्हे दाखल होत आहे व प्रशासनने मोका हा कायदा मंजूर केला असल्याने आज व्यापार करणे अवघड झाले आहेत. जर जनवारे कत्तल करणे व वाहतूक करणे व्यापर करणे असे अवघड झाल्यामुळे कुरेशी समाजानी बंद पुकारले आहेत तर बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या वर तात्काळ बंद करावे. जो पर्यत कुरेशी समाजाला न्याय मिळत नाही व मोका कायदे रद्द करण्यात येत नाही तो पर्यंत चिकन मटन व पशू हत्या बंद करण्यात यावे. आज शेतकरी यांना जनवारे बाजारात घेऊन जाण्यासाठी भितीचे वातावरण निर्माण झाले काही गुंडे रस्त्यावर थांबा ऊन वाहने अडवण्यात येते मग त्या वाहन तील जनवारे सोडून गोशाळेत टाकुन देत आहे असे घटना घडत आहेत. जमियतुल कुरेशी समाजाचा अन्यायाविरुद्धचा प्रखर लढा! कुरेशी समाजाने महाराष्ट्र मध्ये पुकारलेले पशु खरेदी-विक्री बंद आंदोलन हा केवळ एक व्यवसाय थांबवण्याचा निर्णय नाही, तर त्यांच्यावर होणाऱ्या अमानुष हल्ल्यांविरुद्ध, खोट्या आणि मनमानी केसेस विरुद्ध, तसेच वर्षानुवर्षे सुरू असलेल्या घोर अन्यायाविरुद्ध पुकारलेला हा एक प्रखर आणि निर्णायक लढा आहे. हा 'बायकॉट' केवळ तात्पुरता बंद नसून, आपल्या हक्कांसाठी आणि सन्मानासाठी दिलेला हा एक



अस्तित्वाचा लढा आहे, जो आता अधिक तीव्र आणि प्रभावीपणे लढला जाईल!

अन्यायाची परिसीमा: सहनशीलतेचा अंत! गेली अनेक वर्षे कुरेशी समाज शांतताप्रियपणे आपला पारंपरिक पशुधन व्यवसायात कार्यरत आहे. मात्र, 'गोरक्षणा'च्या नावाखाली काही समाजकंटकांकडून त्यांच्यावर होणारे अमानुष हल्ले, जीवघेणी मारहाण आणि वाहनांची जाळपोळ हे आता नित्याचे झाले आहे. इतकेच नाही, तर त्यांना कायद्याच्या कचाट्यात ओढण्यासाठी बिनबुडाचे आणि खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. यामुळे त्यांचे जीवन आणि उपजीविका दोन्ही धोक्यात आले आहे. कुटुंबाचे पोट भरणेही मुश्कील झाले आहे. या अन्यायाने आता सहनशीलतेचा अंत झाला आहे. कुरेशी समाज आता या अन्यायाविरुद्ध एकजुटीने उभा राहिला आहे!

'बायकॉट'ची वज्रमुठ: व्यवस्थेला हादरवणारी शक्ती! हा 'बायकॉट' म्हणजे केवळ एक व्यावसायिक निर्णय नाही, तर तो व्यवस्थेला हादरवून सोडण्याची वज्रमुठ आहे. जेव्हा हजारो वर्षांचा पारंपरिक व्यवसाय करणारा एक मोठा कुरेशी समाज असून पशुधन खरेदी-विक्री, मांस उद्योग आणि यावर अवलंबून असलेले हजारो कोटींचे व्यवहार ठप्प झाला असून राज्याच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर याचा गंभीर परिणाम होईल,

* आत्मसन्मानाची मशाल: हा 'बायकॉट' म्हणजे आत्मसन्मानाची मशाल आहे. आपल्या हक्कांसाठी, आपल्या सुरक्षिततेसाठी आणि न्यायासाठी लढण्याची प्रेरणा यातून मिळेल. हा लढा केवळ कुरेशी समाजाचा नाही, तर हा न्याय आणि समानतेच्या तत्त्वांचा लढा आहे. आता निर्णायक लढ्याची वेळ! कुरेशी समाजाचे हे आंदोलन आता केवळ व्यवसाय बंद ठेवण्यापुरते मर्यादित राहणार नाही, तर ते न्याय मिळेपर्यंत आणि अन्यायाची पाळेमुळे समूळ उपटून टाकेपर्यंत सुरू राहील. प्रत्येक हल्लेखोर आणि खोटे गुन्हे दाखल करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. कुरेशी समाजाला सन्मानाने, निर्भयपणे आणि सुरक्षितपणे आपला व्यवसाय करण्याचा कायदेशीर अधिकार मिळालाच पाहिजे तो पर्यंत न्याय मिळत नाही तो पर्यंत बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या बंद करण्यात यावे.

कुरेशी समाजाला न्याय मिळत नाही तो पर्यत बीड जिल्ह्यातील सर्व चिकन मटन व पशू हत्या बंद करण्यात यावे.नसता लोकशाही मार्गाने विविध स्वरूपाचे आंदोलन पुकारले जाईल अशी मागणी जिल्हाधिकारी याच्या कडे ईमेल व्दारे महाराष्ट्र युवक प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात आली आहे..

# बीडमध्ये महोत्सवाचे आयोजन साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे जयंतीची जय्यत तयारी

बीड/प्रतिनिधी

साहित्य, सामाजिक न्याय आणि क्रांतीशील विचारसरणीचे प्रणेते साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात "साहित्य सम्राट गौरव महोत्सव" उत्साहात साजरा होणार आहे. हा भव्य महोत्सव मंगळवार, दि. 29 जुलैपासून 1 ऑगस्टपर्यंत दररोज विविध कार्यक्रमांसह रंगणार आहे.डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव केवळ सण नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवणारा एक आदर्श ठरणार आहे, असे आयोजकांनी सांगितले.

समितीचे अध्यक्ष बळीराम गवते आणि सचिव सुनील पाटोळे यांनी बीडमधील नागरिकांना या गौरव सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या काळात दरवर्षी प्रमाणे यंदाही साहित्य दिंडी, विचारगोष्टी, सांस्कृतिक कार्यक्रम आशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात



आले आहे.अण्णाभाऊ साठेंच्या विचारांचा जागर घडवणारा आणि तरुण पिढीला प्रेरणा देणारा हा महोत्सव बीडकरांसाठी अभिमानाचा ठरणार आहे. आयोजकांच्या म्हणण्यानुसार, "अण्णाभाऊंच्या कार्याचा व साहित्याचा गौरव करताना त्यांची सामाजिक जाण, श्रमिकांसाठीचा लढा आणि शोषितांसाठीची चळवळ नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा आमचा उद्देश आहे." त्यामुळे या साहित्यसम्राट गौरव महोत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहर यांनी केले आहे.


## असे होणार कार्यक्रम

साहित्य सम्राट गौरव महोत्सवात, मंगळवार दि.29 जुलै रोजी सायंकाळी 6 वाजता 500 महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रम, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सभागृह मैदान चांदणे वाडा येथे संपन्न होईल. बुधवार दि.30 जुलै रोजी सायंकाळी 5 वाजता, सुप्रसिद्ध गायिका मंजुषा शिंदे यांचा संगीत रजनी कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे होणार आहे. शुक्रवार दि.1 ऑगस्ट रोजी सकाळी 9 वाजता साहित्य दिंडी, कर्नाटक वाद्य प्रमुख आकर्षण, त्यानंतर सकाळी 10 वाजता अण्णाभाऊ साठे पुतळा येथे ध्वजारोहण, जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पार पडणार आहे. सायंकाळी 5 वाजता भव्य मिरवणूक निघणार आहे.

# बीड बस स्टॅन्डसमोर रात्रीची गुटखा बाजारपेठ सुरूच – पोलिसांची मूकसंमती?

**मागणी काय?**

1. या टपरीवर तात्काळ बंदी आणण्यात यावी.
2. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.
3. गुटखा विक्रेत्याविरुद्ध कठोर कारवाई करावी.
4. रात्रीच्या वेळी टपऱ्यांची व हॉटेल तपासणी नियमित व्हावी.



बीड इम्रान जागीरदार– बीड शहरातील सिटी पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या मुख्य बस स्टॅन्डसमोर दररोज रात्री ११ नंतरही एक टपरी उघडी राहते आणि तिथे सर्रास गुटख्याची, विशेषतः गुटखा, विक्री केली जाते. विशेष म्हणजे, शहरात इतर ठिकाणी पोलीस कारवाई करताना दिसत असले तरी या टपरीवर मात्र एकाही अधिकाऱ्याचे लक्ष जात नाही, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. रात्री ११ ते पहाटे ३ पर्यंत खुलेआम गुटखा विक्री!

**नागरिकांमधील संतापाची भावना:**

रात्रीच्या वेळेस बस स्टॅन्डवर गर्दी असते ती टपरीमुळेच!"
गुटखा, सिगरेट, मावा अशा व्यसनसामग्रीचा खुलेआम ठेपा!"
जर ही टपरी बंद झाली, तर अर्धी तरुण पिढी रात्री बाहेर फिरकणारही नाही!"
या टपरीमुळे अनेक तरुण व्यसनाधीन होत असून, ही बाब समाजाच्या आरोग्यासाठी घातक आहे, असा इशारा समाजसेवक व नागरिक देत आहेत.

**कोणते हितसंबंध जपत आहेत या टपऱ्या?**

बस स्टॅन्डसमोरील ही टपरी फक्त एकच नाही, तर अनेक अडचणींचे मूळ ठरत आहे.
– कायद्याला भीक न घालता वेळोवेळी सुरु राहणारी ही टपरी नेमकी कोणाच्या छत्रछायेखाली आहे?
– कायद्याने बंदी असलेल्या गुटख्याची विक्री इतक्या मोकळेपणाने कशी काय शक्य आहे?

या टपरीवर दहा रुपयांची गायछाप पुडी १५ रुपयांना विकली जाते. व्यापारी सरासरीपेक्षा जास्त दराने माल विकून फायदा कमावत आहे आणि या व्यवहाराला कोणाची तरी "छुपी मंजुरी" मिळत असल्याची चर्चाही रंगू लागली आहे.

## खाकी डागाळली; पिस्तुलाचा धाक दाखवला स्वत:सोबत राहण्यास भाग पाडलं अन् धाराशिवच्या पोलीस अधिकाऱ्याचा बीडच्या महिलेवर अत्याचार



बीड: पोलिस खात्याला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. धाराशिव येथील सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र शिंदे याने बीडच्या एका विवाहित महिलेला पिस्तुलाचा धाक दाखवत वारंवार अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. बीडमधील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पीडितेच्या तक्रारीनंतर खळबळ उडाली आहे. पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार, २०१३ पासून बीड पोलिस दलात कार्यरत असलेल्या शिंदेची ओळख विवाहितेशी झाली ओळखीतून प्रेमसंबंध निर्माण झाले. त्यानंतर शिंदेने पिस्तुलाचा धाक दाखवून विवाहितेवर अत्याचार करत स्वत:सोबत राहण्यास भाग पाडले. बीडहून धाराशिवला बदली झाल्यावरही त्याने वारंवार पिस्तुलाच्या धाकावर अत्याचार केला, शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. पीडितेने धाराशिव येथे सोबत राहण्यास नकार दिल्यानंतर हा प्रकार समोर आला. आरोपीस अद्याप अटक झाली नसल्याचे सांगण्यात आले.

## साताऱ्याचे विजय कदम यांना सांस्कृतिक व साहित्यरत्न पुरस्कार जाहीर

सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर येथील कवी आणि लेखक विजय उषा शहाजी कदम यांना साप्ताहिक आम्ही मुंबईकर यांच्या वतीने दिला जाणारा या वर्षीचा सांस्कृतिक व साहित्यरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. "साप्ताहिक आम्ही मुंबईकरचे" संपादक प्रमोद सूर्यवंशी यांच्याकडून निवडपत्र प्राप्त झाले आहे. हा पुरस्कार रविवार दिनांक २७ जुलै रोजी जुनी अस्मिता शाळा, जोगेश्वरी, मुंबई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. त्यांचा नुकताच "भटक्या" नावाचा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. विविध क्षेत्रातील लोक या कवितासंग्रहाचे कौतुक करत आहेत.तसेच त्यांचे विविध प्रातिनिधिक कवितासंग्रहात सुद्धा कविता प्रकाशित झालेल्या आहेत.तसेच त्यांचे वर्तमानपत्र,दिवाळी अंक अशा ठिकाणी सुद्धा लेख आणि कविता प्रकाशित होतात. तसेच कवी आणि लेखक विजय कदम यांची सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर या ठिकाणी माऊली करिअर ॲकॅडमी व माऊली अभ्यासिका आहे. यामार्फत ते या ठिकाणी पोलिस भरती, आर्मी भरती आणि स्टाफ सिलेक्शन भरती करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.विशेष म्हणजे अनाथ मुलांना मोफत मार्गदर्शन सुद्धा या ठिकाणी दिले जाते. अशा प्रकारे साहित्यिक, प्रशासकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कार्याची नोंद घेऊन मुंबई या ठिकाणी त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.आतापर्यंत त्यांना ६ राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत.

# शफीकभाऊ यांना नगराध्यक्ष करण्यासाठी जिवाचे रान करणार – शेख मुदस्सिर

बीड – (लोक इच्छा प्रतिनिधी )सामाजिक कार्याचा भक्कम पाया, सर्वसामान्य जनतेशी असलेली नाळ आणि युवकांमध्ये अफाट लोकप्रियता लाभलेले एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ यांना बीडचे नगराध्यक्ष करण्यासाठी आम्ही जिवाचे रान करणार असल्याचा निर्धार एमआयएमचे सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष सोहेल शिकलगार आणि मराठवाडा सोशल मीडिया सदस्य शेख मुदस्सिर यांनी व्यक्त केला आहे.

शेख शफीक भाऊ हे सर्व जाती–धमतील नागरिकांना बरोबर घेऊन चालणारे, सर्वसामान्यांच्या समस्या जाणणारे



आणि त्या सोडवण्यासाठी कायम कार्यरत राहणारे नेते म्हणून ओळखले जातात. लोकहिताच्या कार्यात नेहमी पुढे असणाऱ्या अशा लोकप्रिय नेत्याला बीडच्या नगराध्यक्षपदाची जबाबदारी देणे ही काळाची गरज आहे, असे मत या दोन्ही नेत्यांनी व्यक्त केले.

युवकांमध्ये शफीकभाऊ यांचा भरवसा आणि विश्वास आहे. त्यामुळे बीडच्या विकासासाठी, सामाजिक सलोख्यासाठी आणि पारदर्शक प्रशासनासाठी त्यांना नगराध्यक्ष बनवणे अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद करत, ङ्गशफीक भाऊंच्या पाठीशी आम्ही संपूर्ण ताकदीनिशी खंबीरपणे उभे आहोत,ङ्ग असे प्रतिपादन करण्यात आले.

सोहेल शिकलगार व शेख मुदस्सिर यांनी युवकांना आवाहन केले की, त्यांनी



एकजूट दाखवून शेख शफीक भाऊ यांच्या विचारांचा प्रचार करावा, जनतेपर्यंत त्यांचे कार्य पोहोचवावे आणि त्यांच्या विजयासाठी रात्रंदिवस मेहनत घ्यावी.

# आवादा कंपनीच्या मनमानी कारभार विरोधात उपोषणाला बसलेल्या महिलेचा मृत्यूस महसूल आणि पोलिस प्रशासनाचा निष्काळजीपणा जबाबदार ; खा . बजरंग सोनावणे यांनी केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांची घेतलेली भेट हे ऊशिरा सुचलेले शहाणपण:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.२५ ) बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्याकडून शेतकऱ्यांची दिशाभूल करणे,फसवणूक, दडपशाही ,शासनाची दिशाभूल करणे, पोलीस प्रशासनाच्या मदतीने खोटे देण्यात गुन्हे दाखल करणे आदी घटना घडत असताना या सर्व घटनांकडे पोलीस प्रशासन आणि महसूल प्रशासन यांनी शेतकऱ्यांची बाजू न घेता भांडवलदार पवनचक्की कंपन्यांची बाजू घेतल्यामुळे शेतकऱ्यांना कोणीही वाली राहिला नाही त्यातूनच केज तालुक्यातील तहसील कार्यालयासमोर आवाज कंपनीच्या मनमानी कारभारा विरोधात उपोषणास बसलेल्या सुभाबाई गोपाळ भोसले वय ५८ वर्ष या महिलेचा मृत्यू झाला असुन यास सर्वस्वी महसूल व पोलीस प्रशासन जबाबदार आहेत.संब संबंधित प्रकरणी जबाबदार महसूल व पोलीस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

गल्ली पासुन दिल्ली पर्यंत पवनचक्की कंपन्यांना सरकारचे अभय; पिडीत शेतक- यांना वालीच नाही ;मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांना शेतकऱ्यांची मुस्कटदाबी करण्याचा दिला परवाना पवनचक्की कंपन्यांना काही समाजकंटकाकडुन त्रास दिला जात असल्याची तक्रार दि.१३ जानेवारी २०२५ रोजी ४६ पवन ऊर्जा कंपन्यांचे संघटना असलेल्या "विपा" ने केंद्रीय ऊर्जामंत्री राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांना केली होती.त्या अनुषंगाने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि.६ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी बीड अविनाश पाठक यांना पत्र पाठवून कंपन्यांना त्रास देणाऱ्यांचा बंदोबस्त करावा असे लेखी आदेश दिले. पवनचक्की कंपन्यांना त्रास देणारे खंडणीखोर यांच्यावर कठोर कारवाई व्हायला हवी मकोका अंतर्गत कारवाई व्हावी याबद्दल कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. मात्र



याच वेळी बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांचे फसवणूक ,दडपशाही ,शासनाची दिशा करणे ,पोलीस प्रशासनाच्या मदतीने खोटे गुन्हे दाखल करणे आदि .घटना घडत असताना या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दिनांक २१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समितीचे स्थापना केलेली आहे. या समितींना पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चित तपासणे तसेच पवनऊर्जा प्रकल्पांचे निर्मिती होत असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहार व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे .जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाच्या अनुषंगाने उद्धवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे .त्याचप्रमाणे शेतजमीन मालक शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवून प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहकार्य करणे. इत्यादी अधिकार दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि पोलीस अधीक्षक बीड हे सदस्य आहेत त्याचप्रमाणे उपविभागीय स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार सचिव आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात कारवाईची मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली

## खा.बजरंग बप्पा सोनावणे यांना ऊशिरा सुचलेले शहाणपण; केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांची भेट

बीड जिल्ह्यातील अनेक भागात पवन आणि सौर ऊर्जा प्रकल्प उभारले जात असून शेतकऱ्यांवर दबाव टाकून जबरदस्तीने जमिनीची खरेदी करणे, शेतकऱ्यांना मारहाण करणे, विनापरवाना, बेकादेशीर रस्ते करणे आणि शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान करण्याच्या घटलेल्या घडलेल्या आहेत अशी माहिती देत शेतकऱ्यांवर अन्याय झालेल्या प्रकरणात तातडीने कारवाई करावी अशी मागणी खा. बजरंग बप्पा सोनावणे यांनी केंद्रीय नवीन व नवकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांना 3 दिवसांपूर्वी केली आहे.मात्र या घटना वर्षभरापासून घडत असताना आणि त्यांना याबाबत वारंवार निवेदने देऊनही त्यांनी कोणत्याही प्रकारची हालचाल केली नाही हे वास्तव आहे. त्यामुळे खा.बजरंग बाप्पांना ऊशिरा सुचलेले शहाणपण असल्याची प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com